# ठाणे महानगरपालिका, ठाणे

## समाज विकास विभाग

### ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील महिला व बालकल्याण योजना तसेच किन्नर व्यक्तींसाठी योजनेबाबत

## जाहिर सुचना

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील महिला व बालकल्याण योजना तसेच किन्नर व्यक्तीच्या कल्याणार्थ सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षामध्ये विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत असून ठाणे महानगरपालिका हद्दीत रहिवाशी असणाऱ्या महिला व मुली तसेच किन्नर व्यक्तींसाठी सदर योजनेचा लाभ घेण्याकरीता **योजना क्रमांक १ ते ४ या योजनांचे अर्ज** दि.१२/१०/२०१८ ते दि.१२/११/२०१८ पर्यंत ठाणे महानगरपालिकेच्या सर्व प्रभाग समिती कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. परिपूर्ण भरलेले अर्ज दि.१२/१०/२०१८ ते दि.१४/११/२०१८ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यत **अर्ज प्रभाग समिती कार्यालयात स्विकारण्यात येतील.**योजना क्र. ४ (इ) व्यतिरिक्त एका लाभार्थ्यास एकाच योजनेचा लाभ घेता येईल कृपया याची नोंद घ्यावी.

**समाज विकास विभागाकडून महिला व बालकल्याण तसेच किन्नर व्यक्तीसाठी पुढील कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत.**

| अ.क्र | योजना क्र. | योजनेचे नाव |
|---|---|---|
| १. | १.(अ) | **राजकन्या योजना :** मुलगी जन्माला आल्यावर तिच्या सर्वांगिण विकासासाठी आर्थिक मदत करणे. (प्रती लाभार्थी रु.१५,०००/-) |
| | १.(आ) | १) इयत्ता ८ वीच्या परीक्षेमध्ये ७०% व त्यापेक्षा जास्त गुणांनी उत्तीर्ण झालेल्या मुलींसाठी अर्थसहाय्य करणे. (ठा.म.पा. शाळेतील) (प्रती लाभार्थी रु.१०,०००/-) |
| | | २) इयत्ता ९ वीच्या परीक्षेमध्ये ७०% व त्यापेक्षा जास्त गुणांनी उत्तीर्ण झालेल्या मुलींसाठी अर्थसहाय्य करणे. (ठा.म.पा. शाळेतील) (प्रती लाभार्थी रु.१०,०००/-) |
| | | ३) इयत्ता १० वीच्या परीक्षेमध्ये ५५% व त्यापेक्षा जास्त गुणांनी उत्तीर्ण मुलींसाठी (ठा.म.पा. शाळेतील) (प्रती लाभार्थी रु.२०,०००/-) |
| | | ४ ) इयत्ता १२ वीच्या परीक्षेमध्ये ६५% व त्यापेक्षा जास्त गुणांनी उत्तीर्ण मुलींसाठी (ठा.म.पा. क्षेत्रातील) (प्रती लाभार्थी रु.२०,०००/-) |
| | | ५) पदवी परीक्षेत ६०% व त्यापेक्षा जास्त गुणांनी उत्तीर्ण मुलींसाठी (ठा.म.पा. क्षेत्रातील) (प्रती लाभार्थी रु.२५,०००/-) |
| | १.(इ) | ठा.म.पा. क्षेत्रातील मुली/महिला खेळाडूकरिता (जिल्हास्तर/ राज्यस्तर, राष्ट्रीय स्तर, आंतरराष्ट्रीय खेळासाठी) शिष्यवृत्ती देणे. (प्रती लाभार्थी रु.२५,०००/-) |
| | १.(ई) | **कन्यादान योजना :**आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विधवा महिलाच्या मुलींच्या विवाहाकरिता अर्थसहाय्य देणे. (प्रती लाभार्थी रु.५०,०००/-) |
| २. | ३.(अ) | **कुटुंबाचा आकार मर्यादेत ठेवणे:** ठा.म.पा. क्षेत्रातील पहिल्या मुलीनंतर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करणाऱ्या अथवा पहिली मुलगी असतांना दुसऱ्या मुलीनंतर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करणाऱ्या महिलेस अर्थसहाय्य करणे.(प्रती लाभार्थी रु.५०,०००/-) |
| | ३.(आ) | ठा.म.पा. क्षेत्रातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील दुर्धर आजाराने ग्रासलेल्या महिलांना (एचआयव्हीग्रस्त, कॅन्सरग्रस्त, अर्धागवायू, क्षयरोग इ.सारखे गंभीर आजार) (NEFT/RTGS/ECS) द्वारे उदरनिर्वाहासाठी अर्थसहाय्य करणे. (प्रती लाभार्थी रु.५०,०००/-) |
| | ३.(इ) | ६० वर्ष व त्यापेक्षा जास्त वय असणा-या ज्येष्ठ महिलांना उदरनिर्वाहासाठी अनुदान देणे.(एक रकमी) (प्रती लाभार्थी रु.१८,०००/-) |
| | ३.(ई) | जिजामाता/जिजाऊ महिला आधार योजने अंतर्गत अनुदान देणे. (कुटूंबातील कर्त्या व्यक्तीचे निधन झाल्यास एक रकमी अनुदान देणे. वय २१ ते ७०) (प्रती लाभार्थी रु.५०,०००/-) |
| | ३.(उ) | ठा.म.पा.क्षेत्रातील विधवा/परित्यक्त्या महिलांसाठी वार्षिक (११ महिने) एकत्रित घरभाडे देणे.(जास्तीत जास्त प्रती महिना रु.३,०००/- याप्रमाणे किंवा यापेक्षा कमी जे असेल ते) (प्रती लाभार्थी रु.३३,०००/-) |
| ३ | ४.(अ) | ठा.म.पा क्षेत्रातील नोंदणीकृत बचत गटांना फिरता निधी / व्यवसाय वृध्दिंगत करणेकरिता अनुदान देणे. (१ वर्ष पूर्ण झालेले बचत गट) (प्रती लाभार्थी रु.१०,०००/-) |
| | ४.(इ) | मुलींना व महिलांना व बचत गटातील महिलांना व्यावसायिक / रिटेल मॅनेजमेंटचे प्रशिक्षण देणे. |
| | ४.(ई) | किन्नर व्यक्तीच्या उदरनिर्वाहासाठी अनुदान देणे. (प्रती लाभार्थी रु.१८,०००/-) |

**टिप :-** ठाणे महानगरपालिकेच्या सर्व प्रभाग समिती कार्यालयात महिला व बालकल्याण तसेच किन्नर व्यक्तींच्या योजनेचे वरील कालावधीमध्ये अर्ज उपलब्ध असून सदरचे अर्ज पुर्ण विहित कालावधीत भरुन संबंधित प्रभाग समिती कार्यालयात स्विकारण्यात येतील. विविध योजनांचे छापील अर्जावर अनुक्रमांक देण्यात आला असल्याने सदर अर्जाचाच स्विकार केला जाईल. झेरॉक्स अर्ज स्विकारले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**मा. आयुक्त सो. यांच्या मंजुरीने.**

(सही/-)
उपआयुक्त
समाज विकास विभाग,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.